PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2021-22)/21 / of 2021**

## परिपत्रक:

**विषय:— गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणसाठी शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत.**

**संदर्भ:— उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०२०/ प्र.क्र.११६/तांशि—४ दिनांक ०६ सप्टेबर, २०२१**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना वरील परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणसाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे या योजनेच्या लाभासाठी विद्यार्थ्याची व त्याच्या पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून रूपये ८.०० लक्ष इतकी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणसाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०—२१ करीता न राबविता आता ती थेट शैक्षणिक वर्ष २०२१—२२ करीता राबविण्यात यावी. शैक्षणिक वर्ष २०२१—२२ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक वर्ष २०२१—२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यात यावी. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२१—२२ मध्ये परदेशातील विद्यापीठांमध्ये मान्य अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्याची या योजनेसाठी शैक्षणिक वर्ष २०२१—२२ करीता निवड होईल त्या विद्यार्थ्यास शैक्षणिक वर्ष २०२०—२१ (प्रथम वर्ष) वगळता त्या पुढील अभ्यासक्रमाच्या उर्वरीत मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय ठरेल.

या व्यतिरिक्त या योजनेकरीता विहीत करण्यात आलेल्या उर्वरीत अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर २० प्रवेश क्षमतेकरीता शैक्षणिक वर्ष २०२१—२२ करीता सदर योजना संचालक तंत्र शिक्षण यांच्या मार्फत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीचा सुधारित कार्यक्रम खालिल प्रमाणे:—

२/—

PC S D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)



| क्र | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ ते दि.९ नोव्हेंबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजे पर्यंत) |
| २ | ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्हयाशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी/ वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे. त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्हयाशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्रशिक्षण येथे<br><br>वर नमूद केल्याप्रमाणे Online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ ते दिनांक १० नोव्हेंबर,२०२१ (सायंकाळी ५ वाजे पर्यंत) |

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालकांना विनंती करण्यात येते की, संचालक, तंत्र शिक्षण यांनी याबाबत वरिल कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही तात्काळ करावी .

मुंबई–४०० ०३२
03 नोव्हेंबर, २०२१

(सुधिर पुराणिक)
कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

UNIVERSITY
IS/ICD/EOD/20 /-
2 9 SEP 2021
11301
OF MUMBAI

गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: ६ सप्टेंबर,२०२१

वाचा :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.४ ऑक्टोबर, २०१८

२) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.१२ नोव्हेंबर, २०१८

३) शासन शुध्दिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.२१८/१/ तांशि-४, दि.११ फेब्रुवारी, २०१९

४) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/ २/तांशि-४, दि.११ फेब्रुवारी, २०१९

५) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.९/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२०/३८, दि.११ ऑगस्ट, २०२०

<u>प्रस्तावना</u> :- आर्थिक परिस्थितीमुळे खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशातील नामांकित शिक्षण विद्यापीठामधील उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागातर्फे शिष्यवृत्ती देण्यात येते, त्याच धर्तीवर काही सुधारणांसह राज्यातील खुल्या प्रवर्गातील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्याची योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात येत आहे कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ४/५/२०२० अन्वये करण्यात आलेल्या उपाय योजनांमुळे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राबविण्यात आली नाही. ही योजना काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्याचे शासनाचे विचाराधीन होते.

शासन निर्णय : "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे" या योजनेच्या लाभासाठी विद्यार्थ्यांची व त्याच्या पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून रुपये ८.०० लक्ष इतकी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता न राबविता आता ती थेट शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता राबविण्यात यावी. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यात यावी. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठांमध्ये मान्य अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांची या योजनेसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता निवड होईल त्या विद्यार्थ्यास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ (प्रथम वर्ष) वगळता त्या पुढील अभ्यासक्रमाच्या उर्वरित मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय ठरेल.

३. या व्यतिरिक्त या योजनेकरीता विहित करण्यात आलेल्या उर्वरित अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर २० प्रवेश क्षमतेकरीता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता सदर योजना संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. संचालक, तंत्र शिक्षण यांनी याबाबत यापूर्वीच्या कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

५. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक.६६२/२०२१/व्यय-५, दिनांक २२/७/२०२१ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२१०९०७११००१९२८०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

६.९.२१

(नि.ज्यो.घिरटकर)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

का.प्र. - चै.म.कोष्टी
६/९/२०२१

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१९. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. संचालक, आय.आय.टी., पवई, मुंबई
२२. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
२३. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माण गांव, जि.रायगड
२४. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२५. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२६. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२७. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
२९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३२. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
३३. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३४. अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३५. कक्ष अधिकारी(मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
३६. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
३७. निवडनस्ती/तांशि-४